जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३६६ दिनांक - १६/०५/२०२३**

## येरवडा पोलिस स्टेशन पुणे शहर

## जबरी चोरी करणारा आरोपी येरवडा तपास पथका कडून जेरबंद

वडगाव शेरी येथे दि.२९/०१/२०२३ रोजी फिर्यादी हे फोनवर बोलत जात असताना स्कुटीवरुन दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचा मोबाईल जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेले बाबत येरवडा पो.स्टे.गु.र.नं.८५/२०२३ भादवि ३९२,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास करत असताना तपास पथकातील पोलीस अंमलदार तुषार खराडे,सुरज ओंबासे व किरण घुटे यांना त्यांच्या बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की,सदर गुन्हयातील आरोपी हा कल्याणीनगर भागात येणार आहे.सदरची माहिती मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती वरुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे तपास पथकाचे अधिकारी पो्उप.निरी.अंकुश डोंबाळे व पोलीस अंमलदार तुषार खराडे,सुरज ओंबासे,प्रशांत कांबळे,किरण घुटे यांनी तेथे जावून संशयीत इसमाला पळून जात असताना अतिशय शिताफीने पकडले.त्यास त्याचे नाव पत्ता विचारता मोईन हिदायत पटेल वय ३० वर्षे रा.केशवनगर संभाजी चौक,स.नं.०५ मुंढवा पुणे असल्याचे सांगितले.त्याचेकडे चौकशी करता त्याने चोरी केल्याचे कबूल करुन सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले आहे.सदर आरोपीस अटक करुन त्याचेकडून गुन्हयातील चोरीस गेलेला १५,०००/- किंमतीचा मोबाईल व इतर ५ मोबाईल असा एकुण ५५,०००/- रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.गुन्हयाचा पुढील तपास सपोनि रविंद्र आळेकर करत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ -४, श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,श्री.किशोर जाधव वपोनि येरवडा,श्री.बाळकृष्ण कदम,पोनि गुन्हे,येरवडा श्री.जयदिप गायकवाड, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउपनि अंकुश डोंबाळे, सपोफौ प्रदिप सुर्वे, पोहवा गणपत थिकोळे,दत्ता शिंदे,तुषार खराडे,एकनाथ जोशी पोना किरण घुटे,अमजद शेख,सागर जगदाळे,कैलास डुकरे, प्रविण खाटमोडे,किरण अब्दागिरे पोअं अनिल शिंदे,राहुल परदेशी,सुरज ओंबासे, दत्तात्रय शिंदे,प्रशांत कांबळे,अश्विन देठे,सुशांत भोसले यांनी केलेली आहे.


येरवडा पोलीस स्टेशन